# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२०१ दिनांक -२७/०५/२०२४

## वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करुन १२ लाख २५ हजार रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश

फिर्यादी अब्दुल मलीक अस्लम मणिहार यांनी त्यांचे राहते पॅलेश बिल्डींगचे बाहेर पार्क करुन ठेवलेली फियादीची होडाई कंपनीची वेनु मॉडेल असलेली मोटार कार क्रमांक- एम.एच-०३, डी.के- ५९५६ ही दिनांक-२०/०५/२०२४ ते दिनांक २१/०५/२०२४ रोजीचे दरम्यान अज्ञात चोरटयाने चोरी केले बाबत वालीव पोलीस ठाण्यात गु.र.क्र. २७६/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. या प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वसई-विरार परीसरात मोटार वाहन चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ यांनी वाहन चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत आदेश दिले. श्री. उमेश माने- पाटील, सहाय्यक उप आयुक्त, तुळींज विभाग व श्री. जयराज रणवरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शन व सुचनांनुसार वालीव पोलीस ठाणेचे स.पो.नि. सचिन सानप व गुन्हे प्रकटीकरण पथकाने सि.सि.टी.व्ही.फुटेज व गुप्त बातमीदार यांचे आधारे शोध मोहिम राबवुन वसई पुर्वस्थित धुमाळनगर वसई पुर्व परीसरातुन आरोपी नामे रामसिंग उदयसिंग परमार वय : २२ वर्षे रा. ठि. लक्ष्मी टॉवर, विठ्ठल मंदिराचे मागे वालीव वसई पुर्व, ता.वसई जि.पालघर यास ताब्यात घेण्यात आले. नमुद आरोपीतांकडे केलेल्या सखोल तपासात आरोपीतांकडुन चोरी केलेली १ होंडाई कंपनीची वेणु मॉडेल असलेली मोटार कार व १ एक ॲक्टीवा मोटारसायकल असा एकुण अं.रु. १२,२५,०००/- किंमतीची वाहने जप्त करुन एकुण २ वाहन चोरीचे गुन्हांची यशस्वी उकल करण्यात वालीव पो.ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश आले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १ | वालीव पोलीस ठाणे. | गु.र.क्र. २७६/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि |
| २ | वालीव पोलीस ठाणे | गु.र.क्र. २८१/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. उमेश माने-पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा/ मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं/ विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.